| MHKO110009902022 | नियमित दिवाणी दावा क्र. १३२/२०२२ मधील नि. क्र. ६९ खालील आदेश<br><br>श्रीकांत बळवंत मोरे<br><br>वि.<br><br>धनाजी बाबुराव पाटील वगैरे |
|---|---|

सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२२ यांचे वारस यांना दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २२ रूल ३ प्रमाणे रेकॉर्डवर आणणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून योग्य तो आदेश करण्याची विनंती केली आहे.

**०२.** वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. २२ बाबुराव उर्फ बाबासो बळवंत मोरे हे दि. २८.०८.२०२५ रोजी मयत झाले असून त्यांना खालील वारस आहेत-

| अ. क्र. | वारसाचे नाव व पत्ता | प्रतिवादीशी नाते |
|---|---|---|
| १. | रेखा बाबासो मोरे,<br>वय – ६० वर्षे, धंदा- -<br>रा. भैरवनाथ गल्ली, मोरेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर | पत्नी |
| २. | वंदना अमर देसाई<br>वय – ४३ वर्षे, धंदा- -,<br>रा. देसाई गल्ली, भामटे, ता. करवीर, जि. कोल्हापूर | मुलगी |
| ३. | संदीप बाबासो मोरे<br>वय – ४० वर्षे, धंदा- -,<br>रा. भैरवनाथ गल्ली, मोरेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर | मुलगा |
| ४. | दिप्ती सागर आडसूळ | मुलगी |

| | | |
|---|---|---|
| | वय – ३७ वर्षे, धंदा- -,<br>रा. प्लॉट नं. १८, मुक्त सैनिक वसाहत, ॲटोनी इंग्लीश मिडीयम स्कूल समोर, मार्केटयार्ड, जि. कोल्हापूर | |

**०३.** सदरचे वारस सोडून प्रतिवादी क्र. २२ यांना अन्य कोणीही वारस नाहीत. तरी दाव्याचा गुणदोषावर न्यायनिवाडा होणेकरीता प्रतिवादी क्र.२२ यांचे वर नमूद वारस क्र. १ ते ४ यांना सदर कामी रेकॉर्डवर घेणेची विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०४.** प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे कामी त्यांचे म्हणणे दाखल करून अर्ज मुदतीत असलेने योग्य तो आदेश करण्याची विनंती केली आहे.

**०५.** प्रस्तुतचा अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदरचा दावा हा वाटपासाठी, तुटक व पृथ:क कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २२ हे दि. २८.०८.२०२५ रोजी मयत झाले असून मर्यादा कायदा, १९६३ चे आर्टीकल १२० नुसार वादींनी प्रस्तुतचा अर्ज ९० दिवसांच्या आत म्हणजे दि. २७.११.२०२५ पर्यंत दाखल करणे गरजेचे होते. वादी यांनी सदरचा अर्ज दि. २८.१०.२०२५ रोजी मुदतीत दाखल केला आहे.

**०६.** प्रस्तुत दाव्याचे कामी मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसिंडींग टाळण्याकरीता व काम गुणदोषांवर चालून निकाली होणेकरीता मयत प्रतिवादी क्र. २२ चे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेस दाव्याच्या मूळ स्वरूपात बदल होणार नसल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, न्यायाच्या कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करत आहे-

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा नि. ६९ खालील अर्ज विनाखर्च मंजूर करणेत येतो. |
| २. | सदर कामी प्रतिवादी क्र. २२ यांचे वारस अभिलेखावर घेऊन तशी दुरूस्ती या कामी अंतिम आदेशापासून १४ दिवसांच्या आत करावी व दुरूस्तीप्रत सदर कामी हजर करावी. |

स्वाक्षरी/-

**दिनांकः- ११/०२/२०२६.**
**पेठवडगाव**

**( आर. एस. मोरे )**
**३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**पेठवडगाव**